पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा /१२५ /२०१३
पुणे १ दिनांक:- ०१ /०३/२०१३

**प्रति,**
**अध्यक्ष /सचिव,**
**हिंद चारिटी ट्रस्ट, कोलकत्ता द्वारा संचलित,**
**ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कुल, चिंचवड , पुणे-३३**

**विषय :- प्रथम मान्यता मिळणेबाबत.**
संदर्भ :- १. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/ ६६३/०९) /माशि-१ दि.२०/०६/२०१२
२. शासनाचे दिनांक २५/१०/२०१२ चे हेतुपत्र.
३. शासनाचे पत्र क्र. मान्यता-२०१२/(१२८/१२/माशि-१ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २८/०२/२०१३.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कायम विना अनुदान तत्वावर शासनाकडून सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेल्या संस्थाना प्रथम मान्यता मिळणे कामी, हिंद चारिटी ट्रस्ट, कोलकत्ता द्वारा संचलित, ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कुल, चिंचवड पुणे-३३ याजंकडील प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत.

| **अ.क्र.** | **अटी** | **अभिप्राय** |
|---|---|---|
| १ | वरील संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत आहे. | उक्त दोन्ही नियमानुसार संस्था नोंदणीकृत आहे. |
| २ | संस्थेचे विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत/नाहीत | नाहीत. |
| ३ | सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक/शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली आहे/ नाही. | नाही. |
| ४ | संबंधीत संस्थेस कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या आहेत /नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्या बाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित आहे / नाही. | तक्रारी नाही व कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. |
| ५ | संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे / नाही. | बँक बॅलन्स रक्कम रु. ५०,०००,००/-<br>बँकेचे नाव :- ॲक्सीस बँक,<br>पत्ता :- चिंचवड शाखा, ता.मुळशी, जि.पुणे |
| ६ | संस्थेने विहित नमुन्यातील सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे किंवा नाही व अर्जातील संस्थेचे नाव व ठिकाण यात तफावत आहे /नाही | नाही |
| ७ | शासनाची मंजूरी नसताना शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१०० /- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे / नाही | लागू नाही |
| ८ | संस्था अधिनियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पुर्तता ३ महिन्यात पुर्ण करुन या बाबतचे लेखी हमीपत्र संस्थेकडून घेतले आहे / नाही. | तसे हमीपत्र सोबत जोडणेत आलेले आहे. |
| ९ | संस्थेचे शाळेमध्ये शासनाच्या विहित / मान्य केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानूसार शुल्क आकारणी बाबत लेखी हमी पत्र दिले आहे / नाही. | सदर बाबतचे संस्थेचे हमीपत्र सादर केले आहे. |
| १० | शाळात समक्ष भेट दिली असता चालू असलेले वर्ग व विदयार्थी पट उपस्थिती | संस्थेने अठरा महिन्यात शाळा सुरु करणेबाबत हमीपत्र सादर केले असून सद्यस्थितीत शाळा सुरु नाही. |

| | | |
|---|---|---|
| ११ | सक्षम अधिका-याच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडया, जादा तुकडया संबंधीत संस्था उघडणार नाही असे संबंधित संस्थेकडून रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घतले आहे/ नाही. | याबाबतचे हमीपत्र संस्थेने सादर केले आहे. |
| १२ | शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देणेत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधीत शाळा काढणार नाही या बाबत संबंधीत संस्थेकडून रुपये १००/- च्या स्टॅम्प पेरवरवर लेखी हमीपत्र घेतले आहे / नाही. | सदर बाबतचे हमीपत्र सोबत सादर केले आहे. |
| १३ | शासन निर्णय क्र. माशानू/२००७ /(१००१/२००७) (३) माशि-१ दि.१९/१०/२००७ मधीत तरतूदी नुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्य झाले असे गृहीत धरले जाईल सदर शाळा १८ महिन्याचे आत सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा, सदर शाळा सन २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे. | अठरा महिन्यांच्या आत संस्था शाळा सुरु करणार याबाबतचा ठराव संस्थेने सोबत सादर केला आहे. |
| १४ | संस्थेकडून रु २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण संबंधीत नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात. | सदर बाबतचे हमीपत्र संस्थेने सोबत सादर केले आहे. |
| १५ | संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा.नाव, जात जन्म तारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता) | शिक्षक नेमणूका नियमानुसार कराव्यात.<br>सोबत शिक्षक माहिती सादर केली आहे. |

हिंद चारिटी ट्रस्ट, कोलकत्ता द्वारा संचलित, ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कुल, चिंचवड पुणे-३३ ही संस्था उपरोक्त प्रमाणे आर.टी.ई. ॲक्ट २००९ च्या अधिनियमातील निकषांची पूर्तता करीत असल्याने शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या पत्रातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून या संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्न इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणेस प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

1. **मा. शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे -१.**
2. **मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१**